Adarsh Shikshan Sanstha's
**KALIKADEVI ARTS, COMM. & SCI. COLLEGE, SHIRUR (KA.)**
Tq.Shirur (Ka.), Dist.Beed - 413 249

NAAC Grade 'B'

आदर्श शिक्षण संस्थेचे
**कालिकादेवी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय शिरूर (का.)**
ता.शिरुर (का.), जिल्हा : बीड - ४१३२४९

Secretary - **Jaydatta Kshirsagar** (B.E.Mech. Engg.)
Principal - **Mrs.Dr.Deshmane P.B.** (M.A.B.Ed., Ph.D.)

सचिव : **जयदत्त क्षीरसागर** (बी.ई.अभियांत्रिकी अभियंता)
प्राचार्य : **सौ.डॉ.देशमाने पी.बी.** (एम.ए.,बी.एड्., पीएच.डी.)

Web : www.kalikadevicollege.org.in E-mail: Kalikadevicollege@gmail.com Phone / Fax No. (02444) 259590

Ref No. काम.शि/2014-15/177 Date : 31/3/2015

प्रति,

संचालक
आजीवन शिक्षण व विस्तार सेवा विभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ
औरंगाबाद.

विषय:- आजीवन शिक्षण व विस्तार विभाग शै. वर्षे 2014-2015 चा लेखापरीक्षण, विनियोग प्रमाणपत्र आणि कार्यक्रम अहवाल स्विकारणे बाबत...

महोदय,

वरील विषयी विनंती की, आमच्या महाविद्यालयातील आजीवन शिक्षण व विस्तार विभाग शैक्षणिक वर्षे 2014-15 चा वार्षीक अहवाल, लेखापरीक्षण व विनियोग प्रमाणपत्र आपणाकडे सादर करत आहोत.

तरी मा. संचालक साहेबांनी स्विकार करून उपकृत करावे ही विनंती.

O/C

8/4/2015
Department of Lifelong Learning and Extension
Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad.- 431 004

Principal
प्राचार्य
Kalikadevi Arts,Comm. & Sci. College,
Shirur (Ka), Dist. Beed.

Scanned by CamScanner

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

संलग्नित

# कालिकादेवी कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,

# शिरूर (का.) जि. बीड

# आजीवन शिक्षण व विस्तार विभाग

## वार्षिक अहवाल शैक्षणिक वर्षे २०१४-२०१५

समन्वयक
विस्तार सेवा केंद्र
समन्वयक
कालिकादेवी वरिष्ठ महाविद्यालय
शिरूर कासार. जि. बीड

प्राचार्य
Principal
Kalikadevi Art's,Comm. & Sci. College,
Shirur (Ka), Dist.Beed.

Scanned by CamScanner

| | अणुक्रमणिका |
|---|---|
| अ.क्र. | शिर्षक |
| १) | महाविद्यालय स्तरावरील कार्यक्रम |
| २) | समाज स्तरावरील कार्यक्रम |
| ३) | विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन शिबीर |
| ४) | छायाचित्रे |
| ५) | वृत्तपत्र बातमी |

Scanned by CamScanner

# कालिकादेवी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शिरूर (का.) जि. बीड

## अंतर्गत

## आजीवन शिक्षण आणि विस्तार विभाग

## वार्षिक अहवाल

## महाविद्यालयीन स्तरावरील कार्यक्रम

दि. २६ जुलै २०१४ रोजी महाविद्यालयात छत्रपती शाहु महाराज जयंती साजरी करण्यात आली. या प्रसंगी प्रभारी प्राचार्य अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. या वेळी प्राध्यापक जाधव व्ही.एस. यांचे मनोगत संपन्न झाले. ते बोलतांना म्हणाले की, छत्रपती शाहु महाराज यांनी प्रथम १९०२ ला आपल्या संस्थानात प्रथमच आरक्षण लागू केले. त्याचेच रुपांतर आज भारतीय संविधानात राबविल्याचे दिसते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा. डॉ. सुधीर येवले यांनी केले. तर आभार प्रा. बी.टी. पवार यांनी मानले.

दि. २८/०८/२०१४ रोजी आजीवन शिक्षण आणि विस्तार विभाग व सांस्कृतिक विभागाच्या वतीने एक दिवशीय युवा महोत्सव कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. संजय तुपे उपस्थित होते. या प्रसंगी विचार मंचावर आजीवन शिक्षण आणि विस्तार विभाग प्रमुख प्रा. विठ्ठल जाधव तसेच प्रा. सय्यद मॅडम, प्रा. धम्मपाल घुंबरे, प्रा. नवनाथ पवळे, प्रा.राम गांगर्डे आणि प्रा. रमेश लाहोटी हे होते. यांनी विविध विषयावर मार्गदर्शन केले.त्यात लोककला-प्रा.विठ्ठल जाधव, रांगोळी व इतर स्पर्धा प्रा. सय्यद मॅडम, नृत्य प्रकार-प्रा. धम्मपाल घुंबरे, काव्य व वादविवाद प्रकार - प्रा. नवनाथ पवळे, एकनाट्य-प्रा. राम गांगर्डे इत्यादी विषयावर मुलांना सविस्तर मार्गदर्शन देण्यात आले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा. रमेश लाहोटी व आभार प्रा. खंडू वाघमारे यांनी केले.

दि. ०८ सप्टेंबर २०१४ रोजी महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहात **आंतराष्ट्रीय साक्षरता दिन** साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून आजीवन शिक्षण व विस्तार विभाग प्रमुख प्रा. विठ्ठल जाधव हे होते प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. चेतना डोंगळीकर व डॉ. शामा लोमटे या होत्या. डॉ. डोंगळीकर यांनी साक्षरतेचे महत्व थोडक्या शब्दात सांगून मार्मिक असे मार्गदर्शन केले. त्या म्हणाल्या की, आज महाराष्ट्र हा साक्षरतेच्या बाबतीत प्रगतीपथावर आलेला दिसून येत असल्यामुळे. महाराष्ट्राची प्रगती झालेली दिसते. डॉ. शामा लोमटे म्हणाल्या की, महाराष्ट्राची महिला व पुरुष साक्षरता प्रमाण समपातळीवर आणण्याचे काम समाजाने केले पाहिजे. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा. डॉ. अशोक घोळवे यांनी केले तर आभार प्रा. रमेश लाहोटी यांनी मानले.

दि. २८ ऑगष्ट २०१४ रोजी महाविद्यालयाच्या सांस्कृतिक सभागृहात व्यक्तीमत्व विकास व विविध स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन व व्याख्यान घेण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्रभारी प्राचार्य

Scanned by CamScanner

डॉ. संजय तुपे हे होते तर मंचावर उपस्थित दै. पार्श्वभूमीचे ता.प्रतिनिधी मा. अशोक भांडेकर तसेच प्रमुख मार्गदर्शक म्हणून सुजित कांबळे प्रा. विठ्ठल जाधव व प्रा. धम्मपाल घुंबरे हे उपस्थित होते. या प्रसंगी मा.सुजित कांबळे यांनी विविध स्पर्धा परीक्षा विषयक महत्वपुर्ण यशाचे सुत्र सांगितले. त्यात अभ्यास कसा करावा, किती वेळ कोणत्या विषयाचा आभ्यास करावा, बुध्दिमापन तयारी कशी करावी, मुलाखत तयारी कशी करावी व यश कसे मिळवावे याचे सविस्तर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा. धम्मपाल घुंबरे व आभार प्रा. डॉ. सुधीर येवले यांनी मानले.

दि. २८ ऑक्टोंबर २०१४ रोजी महाविद्यालयात **मराठवाडा दुष्काळ कारणे व उपाय** या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्रभारी प्राचार्य डॉ. संजय तुपे तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून मा. आनंद घोडके (ता.कृषी विस्तार अधिकारी) हे उपस्थित होते. या वेळी परिसरातील शेतकरी व विद्यार्थी सहभागी झाले यांना मार्गदर्शन करतांना मा. आनंद घोडके म्हणाले की, दुष्काळाला सामोरे जातांना शेतकऱ्यांनी शेतीपुरक व्यवसाय सुरू करून आपला कौटुंबिक प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करावा. पावसाचे पाणी आडविणे व त्याची साठवनूक करणे हे सर्व शेतकऱ्यांचे कर्तव्य आहे. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा. विठ्ठल जाधव (आजीवन शिक्षण व विस्तार विभाग प्रमुख) यांनी केले तर आभार प्रा. विठ्ठल गुंडे यांनी मानले.

१४ नोव्हेंबर २०१४ रोजी मा. महेश केदार यांचे स्पर्धा परीक्षा तयारी या विषयावर मार्गदर्शन घेण्यात आले. यामध्ये विद्यार्थ्यांना गणित, भूगोल व अभ्यास नियोजन कसे करावे या विषयी महत्वपूर्ण माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रभारी प्रा. डॉ. संजय तुपे हे होते. तर विचार मंचावर उपस्थित डॉ. आडगावकर गणेश हे होते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा. धम्मपाल घुंबरे यांनी केले तर आभार डॉ. सुधीर येवले यांनी मानले.

दि. ०२ डिसेंबर २०१४ रोजी  स्पर्धा महाविद्यालयाच्या वतीने आयोजित करण्यात आली. **लोकसंख्या व सामाजिक समस्या** या विषयावर या निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी महाविद्यालयीन विद्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

दि. ०३ जानेवारी २०१५ रोजी महाविद्यालयाच्या वतीने आजीवन शिक्षण व विस्तार विभाग आणि महिला कक्ष यांच्या संयुक्त विद्यामाने **सावित्रीबाई फुले जयंती निमित्त अन्याय अत्याचार विरोधी रॅली** आणि व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. पी.बी.देशमाने या होत्या. या दिनी प्रथम अन्याय अत्याचार विरोधी रॅलीचे गावातून मार्गक्रमन झाले. व समारोप झाल्यानंतर प्रश्न मंजूषा स्पर्धा घेण्यात आली. त्यानंतर मा. मनिषाताई

Scanned by CamScanner

तोकले यांचे **सावित्रीबाई फुले व स्त्री शिक्षण** या विषयावर व्याख्यान संपन्न झाले. त्या बोलतांना म्हणाल्या की, सावित्रीबाई फुले या फक्त पहिली शिक्षिका बनून थांबल्या नाहित तर या देशातील स्त्री कशी शिक्षण घेईल या विचाराकडे त्यांनी लक्ष केंद्रीत केले. स्त्री मुक्ती ही फक्त स्त्रीयाची नसुन आपल्या देशाची, समाजाची आणि कुटूंबाचीही गरज आहे. ज्या रुढी परंपरा या स्त्री मुक्तीला विरोध करतात त्या रूढी परंपरेला फुले दांमपत्यांनी मोडीस काढले आहे असे प्रतिपादन शेवटी केले. अध्यक्षीय समारोप प्रसंगी प्राचार्य डॉ. पी.बी.देशमाने म्हणाल्या की, सावित्रीबाईचा वसा आणि वारसा स्त्रीयांनी जिथे जिथे संधी मिळेल त्या ठिकाणी दाखविण्याचा प्रयत्न स्त्रियांनी केला पाहिजे.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. अशोक घोळवे यांनी केले तर सुत्रसंचलन डॉ. शाम लोमटे यांनी केले. आणि आभार प्रा. सौ. सय्यद अफरोज यांनी मानले. या वेळी लाभार्थी महिला, विद्यार्थी, विद्यार्थीनी व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी बहु संख्येने उपस्थित होते.

दि. १४ जानेवारी २०१५ रोजी अजीवन शिक्षण व विस्तार विभाग आणि भूगोल विभाग यांच्या संयुक्त विद्यमानेविद्यापीठ परिपत्रकानुसार नामविस्तार दिनाचे आयोजन करण्यात आले. या दिवशी नामविस्तार दिन व भूगोल दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्रभारी प्राचार्य डॉ. संजय तुपे, प्रमुख उपस्थिती मध्ये प्रा. सय्यद अमजद (के.एस.के.महाविद्यालय बीड) हे उपस्थित होते. यावेळी नामविस्तार दिनाचे महत्व सांगतांना प्रा. विठ्ठल गुंडे (इतिहास विभाग प्रमुख ) यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. ते बोलतांना म्हणाले की, हैद्राबाद संस्थान, निजाम यांचे मराठवाडयावर कसे वर्चस्व होते आणि विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव देणे कसे योग्य होते हे विविध उदाहरणे देऊन पटवून दिले.

दि. ०३ फेब्रुवारी २०१५ रोजी महाविद्यालयीन स्वच्छता कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाची सुरूवात महाविद्यालयीन परिसर स्वच्छता, कचरा उचलने व झाडांची निगा राखणे त्यांना सांभाळने याचे शिक्षण देण्यात आले व श्रमदान घेण्यात आले. यात प्राचार्य डॉ. देशमाने मॅडम यांनी स्वच्छतेचे महत्व सांगून विद्यार्थ्यांना प्ररित करण्यात आले. श्रमदानाचे महत्व कळावे त्यांनी श्रम करण्यास लाजू नये यासाठी या कार्यक्रमाचे अयोजन करण्यात आले.

**समाज स्तरावरील कार्यक्रम**

१३ आक्टोंबर २०१४ रोजी लोणी येथील समाजमंदिरात धार्मिक भोंदुगिरी आणि अंधश्रध्दा या विषयावर व्याख्यान संपन्न झाले. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे त्रिविक्रमानंद शास्त्री (इंदुवासिनी देवस्थान, पिंपळनेर) यांचे व्याख्यान संपन्न झाले. ते पुढे बोलतांना म्हणाले की, समाजात धार्मिक आंधश्रध्दा फार मोठया प्रमाणात वाढली आहे. श्रध्दा आसावी पण ती डोळस श्रध्दा असावी.

Scanned by CamScanner

धर्माच्या नावावर स्त्रीयांवर जे आत्याचार होतात ते प्रमाण कमी होणे गरजेचे आहे. जो कोणी साधू/बापू स्त्रीयांवर अन्याय करेल त्यास ताबडतोप शिक्षा होणे गरजेचे आहे. त्या नुसार त्यास सजा व्हावी व त्यांचे संस्थान आणि ट्रस्ट यांची नोंदणी रद्द करून त्यावर शासनाने प्रशासक नेमले पाहिजे. ज्या प्रमाणे विठ्ठल मंदिरावर सध्या जे सदस्य नियुक्त आहेत ते शासनाने नियुक्त केलेले आहेत त्या प्रमाणे सर्व समुहाच्या समाजाचे प्रतिनिधी सर्व धार्मिक ट्रस्टवर असावेत. संविधानानुसार सर्व धार्मिक ट्रस्ट चालविणे अवश्यक आहे. असे अवाहन त्यांनी केले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा. डॉ. अशोक घोळवे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. नवनाथ पवळे यांनी मानले.

दि. १७ नोव्हेंबर २०१४ रोजी आजीवन शिक्षण व विस्तार विभागाच्या वतीने झापेवाडी या गावी महिला सक्षमीकरण या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून डॉ. चेतना डोंगळीकर व प्रमुख व्याख्याता म्हणून मा. मिनाताई उगलमुगले या होत्या. पुढे बोलतांना आसे म्हणाल्या की, महिलांनी प्रत्येक क्षेत्रात पुढे यावे. उदा. बचतगट चळवळ, उद्योग व समाजकार्य इ. क्षेत्रात आवडीनुसार कार्य करावे आणि स्वत:ला प्रगत करावे. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा. रमेश लाहोटी यांनी केले तर आभार प्रा. विठ्ठल गुंडे यांनी मानले.

दि. १५ डिसेंबर २०१४ रोजी शिरूर येथील सिध्देश्वर मंदिरात मा.पठाण युनुस (कॅशियर बॅक ऑफ इंडिया) यांचे **अर्थ साक्षरता** या विषयावर व्याख्यान संपन्न झाले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्रा. विठ्ठल जाधव हे होते. प्रमुख पाहुणे आपल्या मार्गदर्शनात म्हणाले की, अर्थाशिवाय जीवनाला अर्थच नाही म्हणून आपल्या कुटूंबासाठी अर्थिक नियोजन करणे गरजेचे आहे. तसेच सर्व कामासाठी किती आर्थीक बजेट लागेल, आर्थीक भरभराटीसाठी कोणकोणता उद्योग करावा व आर्थीक रोजगार कसा वाढेल या विषयी आर्थीक साक्षरता होणे गरजेचे आहे.

या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा. उध्दव चौधर यांनी केले तर आभार प्रा. संदिप संपाळ यांनी मानले.

दि. २५ जानेवारी २०१५ रोजी राक्षसभूवन या गावी **भारतीय सविंधान परिचय** या विषयावर व्याख्यान संपन्न झाले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्रा. राज कोरडे (इंग्रजी विभाग प्रमुख) हे होत

Scanned by CamScanner

होततर प्रमुख मार्गदर्शक म्हणून अॅड. गाडेकर प्रिती या होत्या. या प्रसंगी बोलतांना म्हणाल्या की, सर्व धार्मिक लोकांच्या कल्याणाचा एकच मार्ग म्हणजे संविधान संस्कृती राबवीने होय. या मुळेच सर्व समाजाचे लोक संविधानातील विचारांचा प्रचार व प्रसार करतांना दिसत आहे. संविधान हा राष्ट्रीय ग्रंथ म्हणून सर्वांनी मान्य केला पाहिजे. अशा प्रकारचे उद्‌गार त्यांनी काढले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा. बी.टी.पवार यांनी केले तर आभार डॉ. सुधीर येवले यांनी मानले.

दि. ०६ फेब्रुवारी २०१५ रोजी दहिवंडी या गावी आजीवन शिक्षण विस्तार विभाग व लोकप्रशासन विभाग यांच्या वतीने अभ्यास दौरा काढण्यात आला. या प्रसंगी मुलांना **ग्रामपंचायत व गावचा प्राचीन इतिहास** या विषयाच्या अनुषंगाने प्रत्यक्ष भेट देऊन माहिती घेण्यात आली. त्यात गावची ग्रामपंचायत, गावातील प्राचीन पाणी व्यवस्थापनाचा नमुना असलेला जुना आड तसेच ग्राम प्रशासनातील जन्म मृत्यु नोंद, सांडपाणी व्यवस्थापन इ. प्रशासकीय बाबी ग्रामपंचायत कार्यालयात जाऊन निरीक्षण करण्यात आले.अशा प्रकारे याचा उद्देश असा की, मुलांना गावातील ग्रामपंचायत प्रशासन, कार्यपध्दती तसेच पुरातन गोष्टीचा इतिहास माहिती व्हावा हा हेतू साध्य करण्यात आला.

या कार्यक्रमाचे मार्गदर्शक प्रा. विठ्ठल जाधव ( आजीवन शिक्षण विस्तार विभाग तथा लोकप्रशासन विभाग प्रमुख ) व प्रा. विठ्ठल गुंडे (इतिहास विभाग प्रमुख) या दोन विभागाच्या मार्गदर्शनाखाली अभ्यास दौरा संपन्न झाला. या कार्यक्रमास गावातील नागरीक, विद्यार्थी व सरपंच आणि सदस्य यांनी स्वंयस्पुर्त सहभाग घेतला.

## विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन शिबीर

दि. २७,२८ जानेवारी २०१५ रोजी महाविद्यालयात विद्यार्थी समुपदेशन व व्यवसाय मार्गदर्शन शिबीर संपन्न झाले. प्रथम उद्‌घाटन सत्र संपन्न झाले. यात **समुपदेश बीजभाषण** घेण्यात आले. या सत्रात मा. गणेश नागरगोजे ( यु.पी.एस.सी. पात्र असि.कमांडंन्ट) यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा व व्यक्तिमत्व विकास इ. विषयी सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी पुढे बोलतांना असे सांगितले की, विद्यार्थ्यांनी विस्तार कार्यक्रमात सतत सहभागी होऊन आपले व्यक्तिमत्व घडविले पाहिजे. साक्षरता, वनसंरक्षण,पर्यावरण,स्पर्धापरीक्षा, मानवी मुल्य, अभ्यासपध्दती व ध्येय निश्चिती अशा अनेक विषयावर प्रेरणादायी विचार व्यक्त केले. या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ. पी.बी.देशमाने म्हणाल्या की, महाभारतातील एकलव्या सारखा गुरूविना अभ्यास करावा आणि अर्जुनासारखे परिस्थितीशी लढावे अशा प्रकारे अभ्यास आणि संघर्षपुर्ण जीवन

Scanned by CamScanner

जगलात तर तुमच्या जीवनाचे कल्याण होण्यास वेळ लागणार नाही. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. विठ्ठल जाधव यांनी केले तर कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा.बी.टी.पवार यांनी केले तर आभार प्रा. गोवर्धन येडे यांनी मानले.

याच दिवशी दुपारच्या सत्रात मा. पारवे पाटील (पोलीस उपनिरिक्षक शिरूर) यांचे मार्गदर्शन लाभले त्यांनी पोलीस भरती, शारीरिक पात्रता, लेखी परीक्षा, प्रश्नांचे स्वरूप, परीक्षा पध्दती या विषयावर सविस्तर असे मार्गदर्शन केले. या सत्राचे अध्यक्ष म्हणून प्रा. डोंगरे सर हे होते.या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रा. राम गांगर्डे यांनी केले तर आभार प्रा. रमेश लाहोटी यांनी मानले.

दि. २८ जानेवारी २०१५ रोजी दुसऱ्या दिवशी प्रथम सत्रात **कौशल्य विकास** या विषयावर प्रा. ज्ञानेश्वर येवले (वाणिज्य विभाग प्रमुख यांचे व्याख्यान संपन्न झाले. ते म्हणाले की, विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीच्या विषयात कौशल्य प्राप्त करावे. भारतीय विद्यार्थ्यांने आणि सर्व साधारण नागरीकांनी ही किमान एक तरी कौशल्य आत्मसात केले पाहिजे तरच देश विकासित राष्ट्रात गणला जाईल. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्रा. धम्मपाल घुंबरे हे होते. या सत्राचे सुत्रसंचलन प्रा. सय्यद अफरोज यांनी केले. तर आभार डॉ. शामा लोमटे यांनी मानले.

याच दिवशी द्वितीय सत्रात डॉ. अशोक घोळवे यांनी **व्यवसाय मार्गदर्शन** या विषयावर सविस्तर असे मार्गदर्शन केले. ते बोलतांना म्हणाले की, प्रत्येक नागरीकांनी व विद्यार्थ्यांनी स्वतःचा व्यवसाय केला पाहिजे. ज्यांना व्यवसायत रूची वाटते त्यांनी आपले करीअर व्यवसायत विकसित केले पाहिजे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून डॉ. संजय तुपे हे होते त्यांनी शेतकऱ्यांनी शेती बरोबरच शेती पुरक व्यवसाय केला तर आत्महत्या करण्याची वेळ येणार नाही असे आपल्या मनोगतात सांगितले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन डॉ. पंडित मुळे यांनी केले तर आभार प्रा. उध्दव चौधर यांनी मानले.

Scanned by CamScanner